मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# हिंजवडीसह सात गावे पिंपरी-चिंचवड महापालिकेत घ्या

## मावळचे खासदार श्रीरंग बारणे यांचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या हद्दी लगत असलेली आयटी पार्क हिंजवडी, माण, मारूंजी, जांबे, नेरे, सांगवडे, गहुंजे ही सात गावे महापालिकेत घ्यावीत. त्यामुळे या गावांचा नियोजनबद्ध विकास होईल, असे साकडे मावळचे शिवसेना खासदार श्रीरंग बारणे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना घातले आहे. त्यावर समावेशाची तत्काळ कार्यवाही करण्याचे आदेश उपमुख्यमंत्री शिंदे यांनी नगरविकास विभागाच्या प्रधान सचिवांना दिले.

---

# तीन वर्षानंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नाही

## मोशीकरांना वापरावा लागतोय जुनाच पिनकोड; नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी

**पिंपरी | प्रतिनिधी**

मागील तीन वर्षापूर्वी मोशीकरांसाठी नवीन पोस्ट कार्यालय आणि नवीन पिनकोड सुरु करण्यात आला. मात्र तीन वर्षानंतरही नवीन पिनकोड कार्यान्वित नसल्याने विद्यार्थ्यांना, इतर लोकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे परिसरातील नागरिक, पालक यांच्यामध्ये नाराजी निर्माण झाली आहे.

नवीन पोस्टऑफीस, पिनकोड दिला मात्र कार्यान्वित नसल्याने जुनाच पिनकोड आळंदी पोस्ट ऑफिस चा वापरावा लागतो. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना ॲडमिशन घेताना, पॉलिसीच्या ठिकाणी नवीन पिनकोड अस्तित्वात नसल्याचे सांगितले जाते. नाईलाजाने जुना पिनकोड वापरावा लागतो.
**- संतोष बोराटे, सामाजिक कार्यकर्ते.**

नागरिकांना जुनाच पिनकोड वापरावा लागत आहे. त्यामुळे तीन वर्षापासून सुरु केलेल्या पिनकोडचा काहीच उपयोग होत नाहीए. नागरिकांना अडचणी येत आहेत. त्यामुळे हा पिनकोड कार्यान्वित करावा.
**- रूपाली आल्हाट, सामाजिक कार्यकर्त्या.**

पिनकोड कार्यान्वित करण्यासाठी केंद्र सरकारच्या हातात असते. पोस्टऑफीस मध्ये आम्ही फक्त शासनाकडून आलेल्या सुविधा देण्याचे काम करतो. नवीन पिन अजूनही कार्यान्वित नसल्याने तक्रारी येत आहेत.
**- सारिका नलावडे, पोस्ट ऑफीस एसपीएम.**

# जुन्या पुलांसाठी तज्ज्ञ नियुक्तीचा मार्ग मोकळा

## एकूण 1 हजार 34 पुलांचे होणार स्ट्रक्चरल ऑडिट : महापालिकेच्या स्थायी समितीची मान्यता

**पुणे | प्रतिनिधी**

मावळ तालुक्यातील कुंडमळा येथील पूल पडल्याच्या घटनेमुळे पुण्यात खळबळ उडाली होती. या घटनेत अनेकांना जीव गमवावा लागला होता. असे असतानाच शहरातील जुन्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट करण्याची प्रक्रिया तज्ज्ञ सल्लागार नियुक्तीअभावी रखडली होती. मात्र, शुक्रवारी झालेल्या महापालिकेच्या स्थायी समितीच्या बैठकीत तज्ज्ञ सल्लागार नियुक्तीला मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे आता शहरातील एकूण १ हजार ३४ मोठ्या पुलांसह छोट्या पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे, अशी माहिती प्रकल्प विभागाचे प्रमुख दिनकर गोजारे यांनी दिली.

### दर तीन महिन्यांनी होणार ऑडिट

» पुणे शहरातील पूल, उड्डाणपूल, रेल्वे ब्रिज, फुटओव्हर ब्रिज, भुयारी मार्ग, कल्व्हर्ट आदींच्या स्ट्रक्चरल ऑडिट करण्याचा निर्णय घेणयात आला आहे. यामध्ये मोठे पूल एकूण ९८, नाले, ओढे आणि जास्त वाहतुकीचे असलेले एकूण २३६, तर लहान पण कमी वापरात असलेले असे एकूण सुमारे ७०० पुलांचे स्ट्रक्चरल ऑडिट केले जाणार आहे. हे ऑडिट दर तीन महिन्यांना केले जाणार आहे. तपासणी अहवालानुसार पुलांच्या कामाला प्राधान्यक्रम ठरविला जाईल. स्ट्रक्टॉनिक कन्सल्टिंग इंजिनिअर्स यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणूक करण्यात आली आहे.

---

# पुणे रेल्वे स्थानकावर रोजचे पावणेदोन लाख प्रवासी

## गर्दीमुळे पायाभूत सुविधांवर ताण, हडपसर, खडकीतून गाड्या सोडण्याचे

**पुणे | प्रतिनिधी**

मध्य रेल्वेच्या पुणे रेल्वे स्थानकावरील प्रवाशांची गर्दी गेल्या तीन वर्षांत लक्षणीय वाढली आहे. त्यामुळे स्थानकाच्या पायाभूत सुविधांवर ताण निर्माण होत आहे. त्या पार्श्वभूमीवर हडपसर आणि खडकी या नवीन स्थानकांच्या पुनर्बांधणीला गती दिली असून, येत्या वर्षभरात लांब पल्ल्याच्या गाड्या या स्थानकांवरून सोडण्यासाठी रेल्वे प्रशासनाकडून नियोजन सुरू आहे.

### खडकी, हडपसरमधून लांब पल्ल्याच्या गाड्या

» हडपसर स्थानक सोलापूर, हैदराबाद आणि दक्षिण भारताकडे जाणाऱ्या गाड्यांसाठी उपयुक्त ठरेल, तर खडकी स्थानकावरून मुंबई, उत्तर भारत आणि गुजरातकडे धावणाऱ्या गाड्या सोडण्याची शक्यता वर्तविण्यात येत आहे.

# तीन लाखाहून अधिक नागरिकांनी भरला ऑनलाइन कर

## 1 एप्रिल ते 16 जुलै या कालावधीत तब्बल 4 लाख 28 हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण 544 कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला आहे. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.\

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला आहे. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.

मालमत्ता कर हा महापालिकेचा मुख्य उत्पन्नाचा स्त्रोत असून शहरात सुमारे ६ लाख ३० हजार मालमत्ता आजमितीस नोंदल्या गेल्या आहेत. शहरात निवासी, औद्योगिक, बिगर निवासी, मिश्र, मोकळ्या जमीन अशा 6 लाख 32 हजार नोंदणीकृत मालमत्ता आहेत. या मालमत्ता धारकांकडून महापालिकेच्या कर आकारणी व कर संकलन विभाग कर वसूल करत आहे. गतवर्षी या विभागाच्या वतीने राबविलेल्या विविध उपक्रमात जनजागृती, जप्ती मोहीम, मालमत्ता धारकांना नोटीसा, नळ कनेक्शन बंद करणे कारवाई सुरु आहे. महापालिकेच्या वतीने १ एप्रिल ते ३० जून २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलतीची सुविधा देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ ३ लाख २३ हजार २३९ मालमत्ताधारकांनी घेतला.

महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांना यावेळी सवलत घेता आली नाही, त्यांच्या सोयीसाठी महापालिकेने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. नागरिक विविध पर्यायांचा वापर करून कर भरणा करत आहेत. ऑनलाइन प्रणाली, कॅश काउंटर, ईडीसी, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, BBPS अशा माध्यमातून कर भरणा सुरू आहे.

पिंपरी-चिंचवड शहरातील नागरिक मोठ्या प्रमाणात ऑनलाइन पद्धतीने मालमत्ता कर भरला आहे. १ एप्रिल ते १६ जुलै या कालावधीत तब्बल ४ लाख २८ हजार मालमत्ता धारकांनी मिळून एकूण ५४४ कोटी रुपयांचा कर भरणा केला आहे.




### ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत

**» महापालिकेच्या कर संकलन व कर आकारणी विभागाच्या वतीने मालमत्ता धारकांसाठी ३० जून २०२५ पर्यंत संपूर्ण कराचा भरणा ऑनलाइन स्वरूपात केल्यास १० टक्के सवलत व कुटुंबातील महिलेच्या नावावर असलेल्या एका निवासी मालमत्तेवर ३० टक्क्यांपर्यंत सूट देण्यात येत आहे. तसेच ज्या मालमत्ताधारकांना यावेळी सवलत घेता आली नाही, त्यांच्या सोयीसाठी महापालिकेने १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ या कालावधीत ऑनलाइन कर भरणाऱ्यांना ४ टक्के सवलत जाहीर केली आहे. नागरिक विविध पर्यायांचा वापर करून कर भरणा करत आहेत. ऑनलाइन प्रणाली, कॅश काउंटर, ईडीसी, आरटीजीएस, डिमांड ड्राफ्ट, BBPS अशा माध्यमातून कर भरणा सुरू आहे.**

### अशी झाली रक्कम जमा

- » ऑनलाइन : ३९४ कोटी ३३ लाख,
- » रोख रक्कम : ३२ कोटी ७० लाख ८० हजार
- » धनादेश : २५ कोटी ६१ लाख २३ हजार
- » ईडीसी : ६ लाख ६ हजार
- » आरटीजीएस : २४ कोटी ६२ लाख ८५ हजार
- » डीडी : ७४ लाख ३२ हजार
- » BBPS - १७ लाख ८३ हजार मालमत्ता कर

# हिंजवडीचा विस्कळीत वीजपुरवठा सुरळीत

## मेट्रो स्थानकाजवळ बिघाड झाल्याची महावितरणची माहिती: 91 उच्चदाब वाहिन्यांवरील वीजपुरवठा पूर्ववत

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी चिंचवड महापालिकेचा मालमत्ता कर १ जुलै ते ३० सप्टेंबर २०२५ याकाळात ऑनलाइन भरल्यास मालमत्ताधारकांना सामान्य करावर ४ टक्के सवलत मिळणार आहे. ज्या मालमत्ताधारकांनी अद्याप मालमत्ता कर भरला नाही, त्यांनी तात्काळ तो भरून या सवलतीचा लाभ घ्यावा, असे आवाहन महापालिकेच्या वतीने करण्यात येत आहे.

पिंपरी चिंचवड महापालिकेने आर्थिक वर्ष २०२५-२६ चा मालमत्ता कर ३० जून २०२५ पूर्वी ऑनलाइन कर भरणाऱ्यांना १० टक्के सवलत महापालिकेच्या वतीने देण्यात आली होती. या सवलतीचा लाभ तब्बल ३ लाख ३७ हजार मालतमत्ताधारकांनी घेतला आहे. ज्या मालमत्ताधारकांना या सवलतीचा लाभ घेता आला नाही,त्यांनी ३० सप्टेंबर २०२५ पर्यंत मालमत्ता कर ऑनलाइन भरल्यास आता ४ टक्के सवलतीचा लाभ घेता येईल.

पिंपरी चिंचवड महापालिकेकडून ऑनलाइन मालमत्ता कर भरणाऱ्यांना देण्यात येणाऱ्या सवलतीमुळे ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्या वाढत आहे. गेल्या सहा वर्षातील पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्यांची संख्येवरून ते स्पष्ट होत आहे. आर्थिक वर्ष २०२० - २१ च्या पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ८८ हजार ९०, आर्थिक वर्ष २०२१-२२ मध्ये १ लाख ११ हजार ९, आर्थिक वर्ष २०२२-२३ मध्ये १ लाख २८ हजार १५ , आर्थिक वर्ष २०२३-२४ मध्ये २ लाख ९ हजार ६२५, आर्थिक वर्ष २०२४-२५ मध्ये २ लाख ६० हजार ७५७ तर आर्थिक वर्ष २०२५-२६ च्या पहिल्या तिमाहित ऑनलाइन कर भरणाऱ्या मालमत्ताधारकांची संख्या ३ लाख ३७ हजार एवढी आहे.




### सर्व परिस्थिती पूर्वपदावर

**» दरम्यान महापारेषणचे बिघाड दुरुस्त होईपर्यंत महावितरणने युद्धपातळीवर अहोरात्र मेहनत घेत सर्व नागरी भागात व बहुतांश उद्योगांचा वीजपुरवठा पर्यायी मार्गाने सुरु केल्याने दिलासा मिळाला होता. आता एकूणच सर्व परिस्थिती पूर्वपदावर आल्याने उद्योगांसह पुणेकरांचा व महावितरणचाही ताण कमी होण्यास मदत मिळाली आहे.**

### कर्मचाऱ्यांचे अथक परिश्रम

**» उपकेंद्रातून वीजपुरवठा पर्यायी मार्गाने वळविणे हे मोठे अवघड काम होते. परंतु, महावितरणच्या व एजन्सीच्या कर्मचाऱ्यांच्या अथक परिश्रमाच्या जोरावर आम्ही संकटावर मात केली. दरम्यानच्या काळात सर्व वीजग्राहकांनी संयम दाखवत महावितरणला सहकार्य केले, असे मुख्य अभियंता सुनिल काकडे यांनी सांगितले.**

# शहरात होणार पाच नवी पोलीस ठाणी!

**गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन सध्याच्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून ही नवीन ठाणी तयार केली जातील, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले.**

**पुणे | प्रतिनिधी**

पुणे पोलिसांकडून लोहगाव, नऱ्हे, मांजरी, लक्ष्मीनगर, येवलेवाडीचा प्रस्ताव गृहविभागाला सादर; विमानतळ, येरवडा, सिंहगड रोड, कोंढवा-भारती विद्यापीठ, हडपसर या ठाण्यांचे होणार विभाजन

पुणे शहरात आणखी पाच नवीन पोलीस ठाणी सुरू करण्याचे विचाराधीन आहे. या संदर्भात पुणे शहर पोलिसांनी शुक्रवारी (दि. ११) गृहविभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. शहराचा वाढता विस्तार आणि गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन सध्याच्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून ही नवीन ठाणी तयार केली जातील, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. लोहगाव, नऱ्हे, मांजरी, लक्ष्मीनगर आणि येवलेवाडी ही पाच नवीन पोलीस ठाणी प्रस्तावित आहे. नुकताच वाढत्या सायबर गुन्हेगारीच्या पार्श्वभूमीवर पाच सायबर पोलीस ठाण्यांच्या निर्मितीला मंजुरी मिळण्याबाबतचा प्रस्ताव पाठविण्यात आला होता.

पुणे पोलीस दलाचे कामकाज अधिक प्रभावी करण्यासाठी सध्याच्या पाच परिमंडळांचे विभाजन करून सात परिमंडळे तयार करण्याचा विचार आहे. नागरिकांच्या तक्रारींचे निवारण अधिक वेगाने व्हावे, हा यामागचा उद्देश आहे. या संदर्भातील प्रस्ताव वित्त विभागाकडे पाठवण्यात आला आहे.

वर्षभरापूर्वी शहरात सात नवीन पोलीस ठाण्यांची निर्मिती करण्यात आली होती. नवीन पोलीस ठाणी, चौक्यांमुळे पोलीस दलाचे कामकाज सक्षम होणार आहे. नागरिकांच्या तक्रारी सोडविण्यास मदत होणार आहे, अशी माहिती सहपोलीस आयुक्त रंजनकुमार शर्मा यांनी दिली.\

पुणे शहरात आणखी पाच नवीन पोलीस ठाणी सुरू करण्याचे विचाराधीन आहे. या संदर्भात पुणे शहर पोलिसांनी शुक्रवारी (दि. ११) गृहविभागाकडे प्रस्ताव सादर केला आहे. शहराचा वाढता विस्तार आणि गुन्ह्यांची वाढती संख्या लक्षात घेऊन सध्याच्या पोलीस ठाण्यांचे विभाजन करून ही नवीन ठाणी तयार केली जातील, असे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितले. लोहगाव, नऱ्हे, मांजरी, लक्ष्मीनगर आणि येवलेवाडी ही पाच नवीन पोलीस ठाणी प्रस्तावित आहे.




## वाहतूक विभागासाठी एक हजार जवान

**» शहरातील वाहतूक कोंडीची समस्या आणि व्हीआयपी व्यक्तींच्या वाढत्या दौऱ्यांमुळे वाहतूक पोलिसांच्या मदतीसाठी मनुष्यबळ अपुरे पडत आहे. यावर उपाय म्हणून वाहतूक पोलिसांना मदत करण्यासाठी महाराष्ट्र सुरक्षा बलाचे (एमएसएफ) एक हजार जवान मिळावेत, असा प्रस्तावही पुणे पोलिसांनी पाठवला आहे.**

## आणखी सात उपायुक्तांची गरज; तत्वत: मंजुरी

**» शहराच्या वाढत्या विस्तारामुळे आणि गंभीर गुन्ह्यांच्या वाढत्या संख्येमुळे नवीन पोलीस ठाण्यांसह अतिरिक्त मनुष्यबळाची गरज भासणार आहे. या गरजेपोटी पुणे पोलीस दलात पोलीस उपायुक्त दर्जाची सात नवीन पदे मंजूर करण्यासंदर्भातील प्रस्ताव पाठवण्यात आला आहे. मुख्यमंत्री आणि गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या प्रस्तावाला तत्त्वतः मंजुरी दिली आहे. प्रस्तावित नवीन पदांमध्ये वाहतूक शाखा, पोलीस मुख्यालय आणि सायबर गुन्हे शाखेत प्रत्येकी दोन उपायुक्त, तसेच विशेष शाखेत एक उपायुक्तांची गरज आहे. गृहविभागाकडे पाठवलेल्या या प्रस्तावात याच सात पदांच्या मंजुरीची मागणी करण्यात आली आहे.**

## संभाव्य नवीन पोलीस ठाणी आणि त्यांचे विभाजन

- **» विमानतळ पोलीस ठाण्यातून लोहगाव पोलीस ठाणे**
- **» येरवडा पोलीस ठाण्यातून लक्ष्मीनगर पोलीस ठाणे**
- **» सिंहगडरोड पोलीस ठाण्यातून नऱ्हे पोलीस ठाणे**
- **» कोंढवा आणि भारती विद्यापीठ पोलीस ठाण्यातून येवलेवाडी पोलीस ठाणे**
- **» हडपसर पोलीस ठाण्यातून मांजरी पोलीस ठाणे**

# पुरंदरमधील महत्त्वाचे प्रकल्प गती घेणार : रवींद्र चव्हाण

**प्रकल्प मार्गी लावण्यासाठी व पुरंदरचा विकास करण्यासाठी संजय जगताप यांचा पक्ष प्रवेश होत आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.**

**पुणे | प्रतिनिधी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली पुरंदरमधील महत्त्वाचे प्रकल्प गती घेणार आहेत. यामध्ये पुरंदर आंतरराष्ट्रीय विमानतळ, गुंजवणी योजना, रेशीम उद्योग, सहकार चळवळ, आणि नदीजोड प्रकल्प यांचा समावेश आहे. हे प्रकल्प मार्गी लावण्यासाठी व पुरंदरचा विकास करण्यासाठी संजय जगताप यांचा पक्ष प्रवेश होत आहे, असे प्रतिपादन भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांनी केले.

सासवड,(ता.पुरंदर) येथे पुरंदर-हवेली विधानसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल होत माजी आमदार संजय जगताप यांनी बुधवारी (दि. 16 जुलै) भाजपमध्ये अधिकृत प्रवेश केला, त्यावेळी चव्हाण बोलत होते. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, सरचिटणीस राजेश पांडे, वासुदेव काळे, मकरंद देशपांडे, गणेश भेगडे, रवी अनासपुरे, जालिंदर कामठे, बाबा जाधवराव, स्नेहल दगडे, अजिंक्य टेकवडे, सचिन लंबाते, राणी भोसले, गणेश बीडकर, तानाजी थोरात, साकेत जगताप, अमोल जगताप आदींचा समावेश होता.

संजय जगताप यांच्यासोबत पुरंदर-हवेली तालुक्यातील जिल्हा परिषद व पंचायत समितीचे माजी सदस्य, साखर कारखान्याचे संचालक, नगरपालिकांचे माजी नगराध्यक्ष व उपनगराध्यक्ष, मार्केट कमिटी व खरेदी-विक्री संघांचे पदाधिकारी, विविध गावांचे सरपंच-उपसरपंच, विकास सोसायट्यांचे प्रतिनिधी आणि काँग्रेसचे माजी पदाधिकारी यांनीही भाजपमध्ये प्रवेश केला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक भाजप जिल्हाध्यक्ष शेखर वढणे यांनी, सूत्रसंचालन महेश राऊत, सागर जगताप, जालिंदर काळे यांनी तर शहराध्यक्ष आनंद जगताप यांनी आभार मानले.



> **“ भाजप केवळ राजकारणाचा नव्हे तर विकासाचा पक्ष आहे. संस्थात्मक कार्य आणि सामाजिक सलोखा या मूल्यांवर भाजप चालतो. विमानतळ, कऱ्हा-नीरा-गुंजवणी नदीजोड प्रकल्प, पाणीपुरवठा योजना, एमआयडीसी विस्तारीकरण, उच्च शिक्षण प्रकल्प, जलजीवन योजना या क्षेत्रांतील प्रश्न सोडवण्यासाठी त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला आहे.**
>
> **- संजय जगताप, माजी आमदार**

> **“ जगताप कुटुंबीय व टेकवडे कुटुबांचे यांचे अतूट नाते असून स्व. चंदूकाका जगताप यांच्या प्रयत्नामुळे माजी आमदार अशोक टेकवडे यांना संधी मिळाली तर होती तर माजी आमदार अशोक टेकवडे आज कार्यक्रमाला उपस्थित राहणार होते पण पूर्व नियोजित परदेशी दौरा असल्यामुळे ते उपस्थित राहू शकले नाहीत.**
>
> **- अजिंक्य टेकवडे, सरपंच, जवळार्जुन**